ePaper
| वर्ष - 6 | अंक - 227 | UDYAM-MH-26-0158827 |
महाईन्यूज™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com | गुरुवार | दिनांक 1 डिसेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# शिवरायांची तुलना थेट मुख्यमंत्र्यांशी, मंत्री लोढा यांच्या वक्तव्यावरून वाद



## आतील पानांत


- आम्ही फक्त प्रश्न सोडवायला
- ऐतिहासिक "रिव्हर सायक्लोथॉन"ची 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स'मध्ये नोंद
- EWS आरक्षणाचा मराठा समाजाला कितपत लाभ...


# सामान्यकरात मिळवा 3 टक्के सवलत!

## पिंपरी-चिंचवडकरांसाठी गुड न्यूज : तुमचा मोबाईल नंबर मिळकतीला लिंक करा

**।पिंपरी-चिंचवड । ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील मिळकतधारकांनी आपला मोबाईल क्रमांक मिळकतींना लिंक केल्यास सामान्यकरात तीन टक्के सवलत देण्यात येणार आहे. त्याचबरोबर मोबाईल क्रमांक लिंक केल्यानंतर महापालिकेच्या विविध योजनांची माहिती आणि मिळकतीच्या बिलाची लिंक मोबाईलवरच उबलब्ध करून दिली जाणार आहे. मिळकतधारकांनी मालमत्ता कराची रक्कम वेळेत भरावी आणि महापालिकेच्या उत्पन्नात वाढ व्हावी, यासाठी



विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. याच अनुषंगाने आकारणी रजिस्टरला नोंद असलेल्या मालमत्तेचे मालक किंवा भोगवटादार यांचे मोबाईल क्रमांक संगणक प्रणालीमध्ये जोडणी केलेले नाहीत. मोबाईल क्रमांक अद्ययावत नाहीत, अशा नागरिकांना मालमत्ताकराची बिले, कर भरणा, कर सवलती, नोटीसा, आदेश इत्यादी संपर्क करुन पोहोच करणे, मालमत्ता कर विषयक माहिती, सूचना नागरिकांना प्राप्त होण्यासाठी जे मालमत्ताधारक ३१ डिसेंबर २०२२ पूर्वी त्यांच्या मिळकतीला मोबाईल क्रमांक लिंक किंवा अद्ययावत करुन थकबाकी व चालू मागणीचे मूळ कराची रक्कम ऑनलाईन पध्दतीने भरणा करतील अशा मालमत्ताधारकांना चालू मागणीतील सामान्यकरात ३ टक्के सवलत देण्यास महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी मंजुरी दिली आहे.

शहरात एकूण ५ लाख ८८ हजार मिळकती आहेत. त्यातील २ लाख ८० हजार मिळकतधारकांचे मोबाईल क्रमांक मिळकतीशी लिंक झाले आहे. उर्वरित ३ लाख ८ हजार मिळकतधारांनी अद्याप आपले मोबाईल क्रमांक मिळकतींसोबत लिंक केलेले नाही. शहरातील सर्व प्रकारच्या मिळकतींना महापालिकेच्या करसंकलन विभागाकडून कराची आकारणी केली जाते. कर भरण्यासाठी शहरात महापालिकेचे १७ करसंकलन विभाग आहेत.

### नागरिकांना कर भरण्यास अधिक सोईचे होणार

**ऑनलाइन कर भरण्याचीही सुविधा उपलब्ध आहे. नागरिकांनी ऑनलाइन कर भरावा यासाठी महापालिकेच्या वतीने वेळोवेळी प्रोत्साहनही दिले जाते. त्यामुळे ऑनलाइन कर भरणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. ऑनलाइन कर भरताना नागरिकांकडून त्यांचा मोबाइल क्रमांक घेतला जात आहे. हा क्रमांक मिळकतींना लिंक होत आहे. मोबाइल क्रमांक लिंक झाल्याने मिळकतधारकांना महापालिकेच्या विविध योजनांची माहिती आणि दरवर्षी कराच्या बिलाची लिंक मोबाइलवर पाठवले जाते. त्यामुळे नागरिकांना कर भरण्यास अधिक सोईचे होणार आहे. जेणेकरून एखादा नागरिक प्रवासात असला तरी तो कर भरू शकेल, हा महापालिकेचा उद्देश आहे.**

# 'पीक अव्हर्समधील' महिलांची कुचंबना थांबणार...

## खास महिलांसाठी केवळ या मार्गावरून धावणार पीएमपी बसेस...

**।पिंपरी-चिंचवड । ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

**शहरात गर्दीच्या वेळी महिलांना पीएमपी बसमधून प्रवास करताना येणाऱ्या अडचणींचा विचार करता पीएमपी प्रशासनाने केवळ महिलांकरिता पिंपरी-चिंचवड शहरात 'महिला स्पेशल बस' (तेजस्विनी) सोडण्याचा निर्णय घेतला आहे. केवळ महिलांसाठी या बसेस धावणार असून, यामध्ये महिला कंडक्टरची नेमणूक केली जाणार आहे.**



पिंपरी-चिंचवड आणि पुणे शहराच्या सार्वजनिक वाहतुकीचा मुख्य कणा पीएमपी आहे. पीएमपी बसेसमधून रोज लाखो प्रवासी प्रवास करतात. यासाठी पिंपरी-चिंचवड आणि पुणे शहरात पीएमपीएलच्या सुमारे दीड हजारपेक्षा अधिक बसेस संचलनामध्ये आहेत. दररोज या बसेसमध्ये मोठी गर्दी असते. विशेषतः सकाळी आठ ते बारा आणि रात्री चार ते आठ या 'पीक 'अव्हर्समध्ये' हे गर्दीचे प्रमाण प्रचंड प्रमाणात असते. त्यामुळे बसमधील महिला प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे गर्दीच्या वेळी महिलांसाठी तेजस्विनी बसेस सोडल्या जातात. मात्र, दुपारी बारा ते सायंकाळी पाच या मधल्या काळात या बसेसमधून पुरुषांना देखील प्रवास दिला जात होता. परंतु आता या बसेसमधून केवळ महिलांना प्रवास करता येणार आहे. तसेच, या सर्व मार्गावरील बसमध्ये महिला कंडक्टरची नेमणूक केली जाणार आहे.

### या मार्गाचा समावेश...

**मनपा ते आकुर्डी, निगडी ते पुणे स्टेशन, भोसरी, हिंजवडी माण फेज तीन, चिंचवडगाव ते भोसरी, चिखली ते डांगे चौक या मार्गावर बस धावणार आहेत.**

# आम्ही फक्त प्रश्न सोडवायला!

## महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनीव्यक्त केली खंत

**पुणे । महाईन्यूज ।**

आम्ही फक्त प्रश्न सोडवायला असतो. आम्हाला कोणी मते देत नाही, अशी खंत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मंगळवारी बोलून दाखविली.रॅपिडो बाईक टॅक्सीच्या विरोधात सोमवारी बंद पुकारलेल्या रिक्षा संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी मंगळवारी राज ठाकरे यांची भेट घेतली. या भेटीमध्ये रिक्षाचालकांनी त्यांच्या समस्या सांगून

**. तुम्ही आजपर्यंत अनेकांचे प्रश्न सोडविले आहेत. तुमचा शब्द कोणी सहसा टाळत नाही. आमचा प्रश्नदेखील मार्गी लावा, अशी मागणी विविध संघटनांच्या प्रतिनिधींनी राज ठाकरे यांच्याकडे केली. प्रतिनिधी मंडळाची बैठक संपताना 'आम्ही फक्त प्रश्न सोडवायलाच असतो', अशी टिप्पणी राज ठाकरे यांनी करताच हशा उसळला.**



त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन करणारे निवेदन राज ठाकरे यांना देण्यात आले. त्यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर राज ठाकरे यांनी ही खंत बोलून दाखविली. रॅपिडो बाईक टॅक्सीमुळे आमचे जगणे नको झाले आहे. तुम्ही आजपर्यंत अनेकांचे प्रश्न सोडविले आहेत. तुमचा शब्द कोणी सहसा टाळत नाही. आमचा प्रश्नदेखील मार्गी लावा, अशी मागणी विविध संघटनांच्या प्रतिनिधींनी राज ठाकरे यांच्याकडे केली. प्रतिनिधी मंडळाची बैठक संपताना 'आम्ही फक्त प्रश्न सोडवायलाच असतो', अशी टिप्पणी राज ठाकरे यांनी करताच हशा उसळला. मते देण्याच्या वेळी अनेक जण आमच्याकडे पाठ फिरवतात, असे राज ठाकरे यांनी बोलून दाखविले.



---

# द्रुतगती मार्गावर अपघात रोखण्यासाठी 'सुरक्षा' मोहीम; जनजागृतीसाठी २४ तास गस्त

## प्रादेशिक परिवहन विभागाची 12 पथके

**पुणे । महाईन्यूज ।**

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग तसेच राष्ट्रीय महामार्गावरील अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी परिवहन विभागाकडून 'सुरक्षा' ही विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. गुरुवारपासून (एक डिसेंबर) या मोहिमेस सुरुवात करण्यात येणार आहे.मुंबई, पुणे, पनवेल, पिंपरी-चिंचवड येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची १२ पथके गस्त



घालणार आहेत. द्रुतगती आणि मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गावरील अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी 'सुरक्षा' ही मोहीम हाती घेण्यात येणार आहे. पुढील सहा महिने या दोन्ही महामार्गावर सहा पथके आणि १५ अधिकारी २४ तास कार्यरत राहणार आहेत. अपघातग्रस्त ठिकाणांची (ब्लॅकस्पॉट) पाहणी करण्यात येणार असून सुरक्षेच्या दृष्टीने अपघातग्रस्त ठिकाणी वाहनचालकांना माहिती देण्यासाठी फलक लावण्यात येणार आहेत, अशी माहिती प्रादेशिक परिवहन अधिकारी डॉ. अजित शिंदे यांनी पत्रकाद्वारे दिली आहे. द्रुतगती मार्ग तसेच राष्ट्रीय महामार्गावर रस्त्याच्या कडेला लावण्यात येणाऱ्या वाहनांवर त्वरित कारवाई करण्यात येणार आहे. वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या ठिकाणांची पाहणी करण्यात येणार आहे.

दोन्ही महामार्गावर वाहतुकीच्या नियमांचे पालन करण्याबाबत ध्वनिवर्धकावरून वाहनचालकांना

# सहकारी संस्थांच्या निवडणुका २० डिसेंबरपर्यंत स्थगित

**पुणे । महाईन्यूज ।**



राज्यातील ग्रामपंचायत निवडणुकांमुळे सहकारी संस्थांच्या निवडणुका २० डिसेंबरपर्यंत स्थगित करण्यात आल्या आहेत. याबाबत सहकार विभागाने आदेश प्रसृत केले आहेत.ग्रामपंचायत आणि सहकारी संस्थांच्या निवडणुका एकाच कालावधीत सुरू आहेत. तसेच अ आणि ब वर्गातील सहकारी संस्थांच्या सदस्यांची संख्या अधिक आहे. या सहकारी संस्थांचे कार्यक्षेत्र एक किंवा अनेक तालुक्यांशी संबंधित असल्यामुळे बरेच मतदार मतदानापासून वंचित राहण्याची शक्यता आहे. जास्तीत जास्त मतदारांच्या सहभागासाठी सहकारी संस्थांच्या निवडणुका २० डिसेंबरपर्यंत स्थगित केल्याचे सहकार विभागाने आदेशात स्पष्ट केले आहे. राज्यातील अ आणि ब वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणुका ज्या टप्प्यावर असतील त्या टप्प्यापासून २० डिसेंबरपर्यंत पुढे ढकलल्या आहेत. मात्र, वर्ग क, ड आणि वर्ग इ तसेच न्यायालयाने निवडणूक घेण्याबाबत आदेश दिलेल्या सहकारी संस्था यातून वगळण्यात आल्या आहेत.

---

# मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर पुन्हा भीषण अपघात, दोन ट्रक १०० फूट दरीत पलटी

**पुणे । महाईन्यूज ।**

## मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर अपघातांची मालिका बोरघाटात तीन ट्रक समोरासमोर धडकले दोन ट्रक जवळ असलेल्या 100 फूट दरीत पलटी

लोणावळा : मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे दिवसेंदिवस मृत्यूचा सापळा बनाताना पहायला मिळत आहे. आज पुन्हा एकदा महामार्गावरील बोर घाटात भीषण अपघात झाला असून तीन ट्रक समोरासमोर एकमेकांना धडकल्याने हा अपघात झाला. धडक एवढी जोरात होती की, यातील दोन ट्रक जवळ असलेल्या १०० फूट दरीत पलटी झाल्या.

या घटनेत एक जण जागीच ठार झाला असून दुसऱ्या ट्रकचा चालक गंभीर जखमी झाला आहे. त्याला बाहेर काढण्याचे काम सुरू आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून बचावकार्य सुरू केले आहे.

याबाबत मिळालेली माहिती अशी की, मुंबई - पुणे महामार्गावर असणाऱ्या मुंबई लेनवर खोपोली हद्दीत असणाऱ्या बोरघाट परिसरात तीन ट्रकची एकमेकांना जोरात धडक झाली. यामध्ये दोन कंटेनरचा चक्काचूर झाला आहे. ही धडक झाल्यानंतर दोन कंटेनर चक्क जवळ असलेल्या १०० फूट दरीत कोसळले. त्यामुळे या अपघाताची भीषणता आणखी वाढली. दरीत कोसळल्याने एका चालकाचा जागेवरच मृत्यू झाला तर दुसरा गंभीर जखमी झाला आहे. त्याला वाचवण्याचे काम स्थानिक नागरिक आणि पोलिस प्रशासनाकडून सुरू आहे.

या घटनेनंतर महामार्ग वाहतूक पोलीस आणि खोपोली पोलीस, देवदूत यंत्रणा, अपघात ग्रस्तांच्या मदतीसाठीची दाखल झाले आहेत.

दरीत कोसळलेल्या कंटेनरमधील एक वाहन चालक गंभीर जखमी आहे. सध्या त्याला बाहेर काढण्याचे काम सुरू आहे. समोर आलेल्या माहितीनुसार एका कंटेनरमध्ये कांदे आणि दुसऱ्या कंटेनरमध्ये घरगुती सामान



असल्याची माहिती समोर आली आहे. यामुळे एक कंटेनर रस्त्यावर पलटी झाल्याने संपर्ण रस्त्यावर कांदेच कांदे झाले होते. या घटनेने बोर घाटात वाहतूक कोंडी झाली असून ती सुरळीत करण्याचे काम प्रशासनाकडून सुरू आहे. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले असून घटनास्थळी बचावकार्य सुरू आहे.

### तब्बल 20 हजारहून अधिक सायकलिस्टची उपस्थिती

# ऐतिहासिक “रिव्हर सायक्लोथॉन”ची ‘इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स’मध्ये नोंद!

## अविरत श्रमदान संस्थेचे डॉ. निलेश लोंढे यांची माहिती



**पिंपरी।**
**।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

**इंद्रायणी नदी संवर्धन आणि पर्यावरण रक्षणाची जनजागृती करण्यासाठी आयोजित केलेल्या ऐतिहासिक ‘रिव्हर सायक्लोथॉन-२०२२’ ची “इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स” मध्ये नोंद झाली आहे. ही तमाम पिंपरी-चिंचवडकरांसाठी अभिमानाची बाब आहे, अशी माहिती अविरत श्रमदान संस्थेचे डॉ. निलेश लोंढे यांनी दिली.**

भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून पिंपरी-चिंचवड महापालिका, अविरत श्रमदान, सायकल मित्र यासारख्या अनेक पर्यावरण प्रेमी संस्था, संघटनांच्या पुढाकाराने पिंपरी-चिंचवडमध्ये “रिव्हर सायक्लोथॉन-२०२२” चे आयोजन करण्यात आले.

या सायकल रॅलीमध्ये सहभागी होण्यासाठी ऑनलाईन रजिस्ट्रेशन करण्याचे आवाहन करण्यात आले होते. पिंपरी-चिंचवडसह पुणे जिल्ह्यातील सुमारे २० हजारहून अधिक नागरिकांनी अधिकृतपणे रजिस्ट्रेशन केले होते. तसेच, प्रत्यक्षपणे ३ हजाराहून अधिक सायकलपटू स्पर्धेत सहभागी झाले. त्यामुळे सुमारे २५ हजार पर्यावरण प्रेमी नागरिकांच्या उपस्थितीत ऐतिहासिक ‘रिव्हर सायक्लोथॉन’ पार पडली, असे डॉ. निलेश लोंढे यांनी सांगितले.

डॉ. लोंढे म्हणाले की, पर्यावरण संवर्धन काळाची गरज आहे. त्यासाठी आम्ही स्वयंसेवी संस्था, संघटनांच्या पुढाकाराने गेल्या ५ वर्षांपासून “रिव्हर सायक्लोथॉन” आयोजित करतो. इंद्रायणी नदी स्वच्छता आणि वसुंधरा संवर्धन याबाबत जनजागृती हा मूळ हेतू आहे. यावर्षी “रि-सायकल-रि-यूज” ही थीम घेवून आम्ही सायकल रॅलीचे आयोजन केले होते.

### ...तर पुढच्या वर्षी पंतप्रधान मोदींना निमंत्रण

**राज्याचे उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, अभिनेता व दिग्दर्शक प्रवीण तरडे, ट्रिपल महाराष्ट्र केसरी नरसिंग यादव, ‘गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड’ सायकलपटू प्रिती म्हस्के, पुणे जिल्हाधिकारी राजेश देशमुख, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, ‘पीएमआरडीए’ आयुक्त राहुल महिवाल यांच्या उपस्थितीमुळे ‘रिव्हर सायक्लोथॉन’ लक्षवेधी ठरली. रॅलीतील नागरिकांचा प्रतिसाद आणि सायकलपटूंची गर्दी पाहता चंद्रकात पाटील यांनी पुढच्या वर्षी ५० हजार सायकलपटूंच्या उपस्थितीत ‘रिव्हर सायक्लोथॉन’ घ्या. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पिंपरी-चिंचवडमध्ये निमंत्रित करुयात, असे आवाहन उपस्थित जनसमुदायाला केले. त्यामुळे संयोजन समितीला प्रोत्साहन मिळाले असून, पुढील वर्षी ‘रिव्हर सायक्लोथॉन’ आणखी मोठ्या उत्साहात आयोजित करण्याचा संकल्प केला आहे, असेही डॉ. निलेश लोंढे यांनी म्हटले आहे.**

# तळेगावातील एल अँड टी कंपनीतील कामगारांचे ४० दिवसांपासून उपोषण

## भूमिपूत्र कामगारांना न्याय द्या, खासदार श्रीरंग बारणे यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**पिंपरी ।**
**।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना प्रणित भारतीय कामगार सेनेचे सभासदत्व स्वीकारल्यामुळे तळेगावातील एल अँड टी कंपनी प्रशासनाकडून मानसिक त्रास दिला जात असल्याने 40 दिवसांहून अधिक दिवस कामगारांचे बेमुदत उपोषण सुरु आहे. परंतु, आजतागायत कंपनीकडून कामगारांना कोणतेही सहकार्य केले नाही. या प्रकरणात लक्ष घालून स्थानिक कामगार भूमिपूत्रांना न्याय देण्याची मागणी बाळासाहेबांच्या शिवसेनेचे उपनेते, मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी केली. याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उद्योगमंत्री उदय सामंत, कामगारमंत्री सुरेश खाडे आणि पुणे कामगार आयुक्त यांना निवेदन दिले आहे. त्यात खासदार बारणे यांनी म्हटले आहे की, मावळ लोकसभा मतदारसंघातील तळेगाव दाभाडे येथे एल अँड टी कंपनी कार्यरत आहे. या कंपनीत स्थानिक भूमीपूत्र कामगार काम करतात. हे कामगार केल्या सात ते आठ वर्षांपासून कंपनीत कार्यरत आहेत. कंपनीने मागील काही महिन्यांपासून कामगारांची पिळवणूक, शोषण करण्याचे काम चालू केले होते.



त्यासाठी कामगारांनी भारतीय कामगार सेनेचे सभासदत्व स्वीकारले. त्याचा राग आल्याने कंपनीकडून कामगारांच्या विविध ठिकाणी बदल्या करणे, कामावरुन काढणे, मानसिक त्रास देण्यास सुरुवात केली. त्यामुळे न्याय, हक्कांसाठी या कंपनीच्या विरोधात स्थानिक भूमीपूत्र कामगारांनी 19 ऑक्टोबर 2022 पासून पुण्यातील कामगार आयुक्तालयासमोर बेमुदत उपोषण सुरु केले. उपोषणाला सव्वा महिना उलटून गेला. तरी, अद्यापही कंपनीद्वारे कोणतीही सहकार्याची भूमिका घेतली नाही. त्यामुळे आपण यामध्ये लक्ष घालून भूमीपूत्र कामगारांना न्याय द्यावा, अशी विनंती खासदार बारणे यांनी केली.

### भारतीय कामगार सेनेच्या कामगारांसाठी खासदार बारणे मैदानात

**भारतीय कामगार सेना ही उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेची आहे. तरी, देखील कामगारांना न्याय मिळावा यासाठी बाळासाहेबांच्या शिवसेनेचे उपनेते, खासदार श्रीरंग बारणे मैदानात उतरले आहेत. कामगारांवरील अन्याय दूर व्हावा यासाठी प्रयत्न करत आहेत. कामगारांच्या बाजूने, त्यांच्या हक्कांसाठी खासदार बारणे उभे राहिले आहेत. कामगार माझ्या मतदारसंघातील आहेत. कामगार कोणत्या पक्षाचे काम करतात याही पेक्षा ते सर्वसामान्य कामगार आहेत. त्यांच्यावर कंपनी प्रशासनाकडून अन्याय होत आहे. कामगारांवरील अन्याय सहन करणार नाही. याबाबत उद्योगमंत्री, कामगार मंत्र्यांशी सविस्तर चर्चा केली आहे. हा प्रश्न सोडविण्याची विनंती केली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना देखील या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात आणून दिले आहे. त्यामुळे लवकरच या कामगारांना दिलासा मिळेल असा विश्वास खासदार बारणे यांनी व्यक्त केला.**

# EWS आरक्षणाचा मराठा समाजाला कितपत लाभ...



भूमिका
निलेश दुटाळ
91- 87668 40811

**सुरुवातीला समाजातील काही घटक शैक्षणिक तसेच आर्थिकदृष्ट्या मागास राहिले असल्याने त्यांना रोजगार तसेच शैक्षणिक लाभ घेता येत नसल्याने डॉ.आंबेडकर यांनी अनुसूचित जमात व अनुसूचित जाती असे गट तयार केले. विशिष्ट समाजाला आरक्षण लागू करण्यात आले. त्यावेळी सुद्धा सर्वसाधारण समाजातील लोक आर्थिक तसेच शैक्षणिकदृष्ट्या मागास होते. याचा विचार केला गेला नाही. आणि आजही संपूर्ण देशात रोजगार आणि शैक्षणिकदृष्ट्या विषमता असून, आर्थिक विषमतेत वाढ होत गेली आहे. 2019 चा ऑक्सफॅम असमानता अहवालात असे म्हटले आहे की, नऊ सर्वात श्रीमंत व्यक्तींची संपत्ती ही देशाच्या तळाच्या एकूण लोकसंख्येच्या 50% लोकांच्या बरोबरीची आहे. यावरुन असे स्पष्ट होते की, आर्थिक विषमतेत फार मोठ्या प्रमाणात विषमता आहे. तसेच इंडियन ह्युमन डेव्हलपेंट (आयएचडीएस) यांच्या 2012 च्या सर्वेमध्ये रोजगार तसेच शिक्षणात असमान संधी असल्याचा निष्कर्ष प्राप्त झाला.**

EWS आरक्षण मिळवण्याकरीता 1 लांखांचे उत्नन्न मर्यादा, तसेच 5 एकरापेक्षा कमी शेतजमीन तसेच ग्रामीण भागात 2000. स्क्वे.फूटापेक्षा कमी व शहरी भागात 1000 स्क्वे. फुटापेक्षा कमी क्षेत्रफळ असलेले घर अशी अट आहे. ग्रामीण भागात रोजगार तसेच शैक्षणिक पुरेशा संधी नसल्याने ग्रामीण भागातील लोक शहरात राहण्यास येतात याचा विचार केलेला नाही. या अटींमुळे भारतातील सर्वसाधारण गटातील बहुसंख्य



लोक EWS आरक्षणात येणार आहेत. 2012 च्या जणगणनेनुसार 121 कोटी लोकसंख्येमध्ये सर्वसाधारण श्रेणीमधील जवळजवळ 27% टक्के लोकसंख्या आरक्षणात बसणार आहे. एवढ्या प्रचंड लोकसंख्येसाठी 10% कोटा हा अपुरा पडणार आहे. त्यातूनही फक्त मराठा समाजाचा विचार केला तर EWS आरक्षणाचा लाभ मराठा समाजासाठी अत्यंत नगण्य असणार आहे.कारण सरकारी नोकरी अथवा शिक्षणामध्ये एकूण जागांमधील 50% आरक्षण हे अनुसूचित जाती आणि जमातीसाठी असणार आहे. उरलेल्या 50% जागांमधील 10% आरक्षण हे सर्वसाधारण गटासाठी असणार आहे.10% जागांमध्ये मोठ्या प्रमाणात सर्वसाधारण गट असल्याने मराठा समाजाला याचा कितपत लाभ मिळेल याचा विचार करण्याची गरज आहे.सर्वांना आरक्षणात आणल्यामुळे सरकारला EWS कार्ड तयार करण्यासाठी मोठ्याप्रमाणात खर्च करावा लागेल. हा सर्व खर्च EWS कार्ड धारकाकडूनच वसुल केला जाईल. 8 लाख उत्पन्न मर्यादा जास्त असल्याने जास्त उत्पन्न असलेले घटक (8 लाखाच्या आतील) याचा जास्तीत जास्त फायदा घेतील व अत्यल्प उत्पन्न असलेला घटक आरक्षणापासून वंचित राहू शकतो. अनुसूचित जाती व जमाती संदर्भातील आरक्षणाच्या सुरुवातीला 1 लाख रु. उत्पन्न मर्यादा होती नंतर त्यामध्ये बदल होत 2004 मध्ये 2.5 लाख रु., 2008 मध्ये 4.5 लाख रु, 2013 मध्ये 6 लाख रुपये व 2017 मध्ये 8 लाख रुपये असे उत्पन्न मर्यादा वाढ होत गेल्यामुळे या समाजातीलही अत्यल्प उत्पन्न असलेला घटक आर्थिक तसेच शैक्षणिक दृष्ट्या मागासच राहिला आहे.

अनेक राज्य मंत्रीमंडळांनी (EWS) आरक्षणास मंजुरी दिली असली तरी प्रत्येक राज्यात त्याची अंमलबजावणी वेगवेगळी होणार आहे. केरळ सरकारने आरक्षणात बदल करुन उत्पन्न मर्यादा 4 लाख रु. व शेती 2.5 एकर व 1000 स्क्वे. फुटापेक्षा कमी क्षेत्रफळ असलेले घर असा बदल केला आहे. जेणेकरुन अत्यल्प उत्पन्न असलेल्या घटकाला त्याचा लाभ होईल. EWS आरक्षण 50% ची मर्यादा ओलांडून दिले असल्याने अ.जा.व अ.ज. व ओबीसी समाजाच्या आरक्षणावर त्याचा कोणताही परिणाम होणार नाही. परंतु (एसईबीसी) अंतर्गत मराठा समाजाला आरक्षण देतेवेळी 50% आरक्षणाची मर्यादा ओलांडून आरक्षण देता येणार नसल्याचे कोर्टाने सांगितले. त्यामुळे आरक्षणाच्या बाबतीत मराठा समाजावर अन्यायच झाला आहे. EWS आरक्षणात मराठा समाजाला सामावून घेतले तर (एसईबीएस) सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास अंतर्गत म्हणजे फक्त मराठा समाजाला विशेष आरक्षण मिळणार नसल्याने मराठा समाजाचा EWS आरक्षणास विरोध असल्याचे लक्षात येत आहे. तसेच विशिष्ट समाज किंवा समाजातील काही घटक अल्ट्रसिटी कायद्याचा गैरफायदा घेत आहेत त्यामुळे शैक्षणिक मागास गटातून विशेष आरक्षण मिळावे व अल्ट्रासिटी कायदा रद्द व्हावा अशी मराठा समाजाची अट होती. त्यासाठी ऑगस्ट 2016 मध्ये मराठा क्रांती मोर्चाला सुरुवात झाली. या मोर्चाचे नेतृत्व कोणताही नेता अथवा पुरुष करता नव्हता. शिस्तबद्ध महिला व तरुणींनी मोर्चाचे नेतृत्व केले. त्यानंतरही शिस्तबद्ध पद्धतीने अनेक मोर्चे निघाले परंतु आजही मराठा समाजाच्या मागण्या मान्य झाल्या नाहीत. त्यामुळे मराठा समाज असमाधानी आहे.

## संपादकीय »

### डिजिटल उपवासाची कहाणी..

***यवतमाळमधले बान्सी आणि उस्मानाबादमधले जकेकूरवाडी ही दोन गावे या आठवड्यात सगळीकडे झळकली ती त्यांनी केलेल्या त्यांच्या गावापुरत्या मोबाइलबंदीसाठी.***

मोबाइल न वापरणारा माणूस थेट अश्मयुगातूनच अवतरलेला असावा असे मानून घेण्याचा सध्याचा जमाना. मी समाजमाध्यमे वगैरे वापरत नाही, असे म्हणणारेही याच न्यायाने आदिमानवाचे भाऊबंद ठरू शकतात. मोबाइल, समाजमाध्यमे, ओटीटी प्लॅटफॉर्म या सगळ्यांनी आजच्या माणसाचे जगणे असे काही झपाटून टाकले आहे की नेटफ्लिक्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी रीड हास्टिंग खुलेआम सांगतात की आमची स्पर्धा इतर कुणाशी नाही तर फक्त माणसाच्या झोपेशी आहे. असे सगळे चाललेले असताना कुणीतरी उठते आणि विशिष्ट वयाच्या मुलांसाठी सरळ मोबाइल वापरावर बंदी आणते, हे खरे तर जगाच्या विपरीत वागणे. पण त्याची चर्चा झाली कारण खेळणे, बागडणे सोडून आज घराघरांतील मुले अक्षरश: हातात मोबाइल घेऊन बसलेली दिसतात. अर्थात मुलांचीच नाही तर मोठ्या माणसांचीही तीच परिस्थिती आहे.

## साध्या उपायांनी मधुमेह बरा होतो का?

**‘टाइप टू’ मधुमेहाबद्दल हे प्रयोग यशस्वी होतानाही दिसतात.. पण प्रतिबंधासाठी साधे उपाय नक्की आहेत!**

‘आंतरराष्ट्रीय मधुमेह दिन’(१४ नोव्हेंबर) साजरा करताना काही साध्या उपायांकडे लक्ष वेधणे गरजेचे आहे- गरजेपुरते पौष्टिक आणि देशी पदार्थ खा, ते सावकाश खा, कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीसाठी दरमहा अर्धा किलोपेक्षा कमीच तेल वापरा- म्हणजे फ्रीझमधले ‘तळण्यास तयार’ खाद्यपदार्थ टाळा.. असे अगदी साधे सल्ले, वैद्यकीय कसोटीवरही खरे ठरतात. व्यायाम ही उत्तम आरोग्याची गुरुकिल्ली आहे. एकाच जागी तासच्या तास बसणे हे घातक ठरू शकते (म्हणून हल्ली विनोदाने ‘बसणे हे नवीन धूम्रपान’ असा वाक्प्रचारही रूढ होतो आहे). बैठेपणा कुणाला टाळता येणारा नाही कबूल, पण यावर साधा उपाय असा की, दर ३० मिनिटांनी तुमची बसण्याची पद्धत बदला आणि बैठक बदलण्यापूर्वी पाच मिनिटे वेगवान चालणे करा. पण म्हणून मधुमेह हटवता येईल? काही ठिकाणी असे प्रयोग सुरू झालेले



आहेत, त्याहीबद्दल इथे लिहिणार आहे. अमेरिकन डायबेटिक्स असोसिएशन’ (एडीए) आणि ‘युरोपियन असोसिएशन फॉर द स्टडी ऑफ डायबेटिस’ या संस्था मिळून काही व्यापक निष्कर्षांना मान्यता देतात, या सहमतीला ‘एडीए-ईएएसडी कन्सेसस’ असे म्हटले जाते. या सहमतीचा निष्कर्ष असा की दररोज कमी वेळ (पाच मिनिटे) पण वारंवार वेगवान चालणे हे तुम्हाला चार वर्षे अधिक जगण्यास मदत करते. दिवसातून १०,००० पावले अशी शिफारस केली जाते; परंतु सध्याची आकडेवारी सांगते की, किमान ६,००० ते ८,००० पावले तरी चालाच. भारतातील अनेक मधुमेहींमध्ये, व्याधी जडण्याच्या आधीपासूनच स्नायूंची शक्ती कमी असल्याचे दिसून येते, याला सारकोपेनिया म्हणतात. म्हणून स्नायू बळकट करणारा व्यायाम (शास्त्रीय सूर्यनमस्कार/ सिटअप) हवा. आपण आपल्या बैठ्या सवयी मोडल्या पाहिजेत, दीर्घकाळ बसणे टाळले पाहिजे. जरी आपण स्थिर असलो तरीही आपण हालचाली केल्या पाहिजेत, यामुळे ‘नीट’ म्हणजेच ‘नॉन एग्झरसाइज ॲक्टिव्हिटी थर्मोजेनेसिस’ला- अर्थात व्यायाम नसलेल्या क्रियाकलापातून ऊर्जाव्ययाला- प्रोत्साहन मिळते. तंदुरुस्त असणे आणि तग धरण्याची क्षमता असणे तितकेच महत्त्वाचे आहे. त्यामुळे हालचाल करणे, चालणे, धावणे किंवा वैद्यकीय डॉक्टरांनी मंजूर केलेल्या कोणत्याही खेळाची किंवा शारीरिक हालचालींची शिफारस मधुमेहात केली जाते. अनेकांकडे नियमित व्यायामशाळा सदस्यत्व असते आणि बऱ्याचदा आपण तंदुरुस्त सदस्याचा अचानक मृत्यू झाल्याचे ऐकतो.

## ।। अभंगवाणी ।।



एका जिवें आतां जिणें जालें दोहीं ।
वेगळीक कांहीं नव्हे आतां ॥१॥
नारायणा आम्हां नाहीं वेगळीक ।
पुरविली हे भाक सांभाळिली ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### नवाब मलिकांना दिलासा नाहीच!"

। मुंबई । महाईन्यूज ।

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नवाब मलिक यांना सत्र न्यायालयानं दिलासा देण्यास नकार दिला. पण कोर्टाच्या या निर्णयाविरोधात मलिक आता हायकोर्टात धाव घेणार आहेत. दरम्यान, मलिकांचा जामीन फेटाळण्यात आला असला तरी त्यांची तुरुंगात रवानगी होणार नाही, त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरु राहणार आहेत. वैद्यकीय कारणासाठी नवाब मलिक यांनी जामीनासाठी अर्ज केला होता, तसेच ईडीच्या तपासावर त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केलं होतं.

# राज्यातील गडकोट किल्ल्यांवर झालेले अतिक्रमण काढणार-मुख्यमंत्री शिंदे

। मुंबई । महाईन्यूज ।

किल्ले प्रतापगडावरील अफजलखान कबर परिसरातील अतिक्रमण हटविले त्याच पद्धतीने राज्यातील गडकोटांवर आणि किल्ल्यांवर करण्यात आलेली अतिक्रमणे माहिती घेऊन तातडीने हटविण्यात येतील.गड किल्ले संवर्धनासाठी दुर्ग प्राधिकरण स्थापन करण्यात येणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवप्रतादिनाच्या कार्यक्रमात जाहीर केले.



किल्ले प्रतापगडावर ३६३ वा शिवप्रताप दिन सोहळयात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते. यावेळी पर्यटन मंत्री मंगलप्रभात लोढा,पालकमंत्री शंभूराज देसाई, , खासदार श्रीनिवास पाटील, रणजितसिंह नाईक निंबाळकर, आमदार छत्रपती शिवेंद्रराजे भोसले, मकरंद पाटील, महेश शिंदे,,महादेव जानकर, भरत गोगावले कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक मनोजकुमार लोहिया, जिल्हाधिकारी रुचेश जयवंशी, मुख्य कार्यकारी अधिकारी ज्ञानेश्वर खिलारी, पोलीस अधीक्षक समीर शेख यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. किल्ले प्रतापगड येथील बुरुजावरील शिवशाहीचे प्रतीक असलेल्या भगव्या ध्वजाचे ध्वजारोहण मुख्यमंत्र्यांनी केले. भवानी मातेची आरती केली. छत्रपतींची मूर्ती ठेवण्यात आलेल्या पालखीचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ पुतळ्यास पुष्पहार मुख्यमंत्री शिंदे यांनी अर्पण केला. छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेले गडकोट किल्ले आज ही प्रेरणा देणारे स्त्रोत असल्याचे सांगून मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, किल्ल्यांची बांधणी, पाण्याचा साठा, प्रवेश द्वार स्थापत्य कलेचे उत्तम उदाहरणे आहेत. आज किल्ले प्रतापगडावर ३६३ वा शिवप्रताप दिन सोहळा मोठया उत्साहात साजरा होत आहे. किल्ले प्रतापगडाच्या संवर्धनाचा १०० कोटींचा आराखडा सादर केला आहे.

## कोविड काळात काम केलेल्या परिचारिकांना सरकारचं गिफ्ट;

### आरोग्य विभागाच्या सेवेत कायम होणार

। मुंबई । महाईन्यूज ।

कोविड काळात कंत्राटी पद्धतीनं काम करणाऱ्या परिचारिकांना शासनानं मोठं दिलासा दिला आहे. ५९७ परिचारिकांची कायमस्वरुपी शासकीय सेवेत नियुक्ती होणार आहे. आरोग्य विभागानं हा मोठा निर्णय घेतला आहे.

कोविडच्या काळात आरोग्य यंत्रणेवर मोठा ताण आल्यानं मोठ्या प्रमाणावर परिचारिकांची तात्पुरत्या स्वरुपात भरती करण्यात आली होती. यांपैकी ५९७ परिचारिकांना कायमस्वरुपी सेवेत घेण्याचा निर्णय राज्य शासनानं घेतला आहे.

या परिचारिकांना कोविड काळात ११ महिन्यांच्या कंत्राटी कामावर घेण्यात आलं होतं. पण कोविडचा संसर्ग कमी झाल्यानंतर त्यांचा करार पुन्हा वाढवण्यात आला होता. पण यानंतर त्यांना सेवेतून पायउतार व्हावं लागणार होतं. या परिचारिकांनी अनेकदा मागणी देखील केली होती की आम्हाला कायमस्वरुपी सामावून घ्या.त्यासाठी दोन्ही गटांना ९ डिसेंबरपर्यंत मुदत देण्यात आली आहे. जीवाची बाजी लावून या परिचारिकांनी कोविडच्या काळात लोकांची सेवा केल्यानं केंद्राची परवानगी घेत राज्य शासनानं या परिचारिकांना राज्य शासनाच्या सेवेत कायम करण्याचा निर्णय घेतला.

**कोविडच्या काळात आरोग्य यंत्रणेवर मोठा ताण आल्यानं मोठ्या प्रमाणावर परिचारिकांची तात्पुरत्या स्वरुपात भरती करण्यात आली होती. यांपैकी ५९७ परिचारिकांना कायमस्वरुपी सेवेत घेण्याचा निर्णय राज्य शासनानं घेतला आहे.**

**या परिचारिकांना कोविड काळात ११ महिन्यांच्या कंत्राटी कामावर घेण्यात आलं होतं. पण कोविडचा संसर्ग कमी झाल्यानंतर त्यांचा करार पुन्हा वाढवण्यात आला होता. पण यानंतर त्यांना सेवेतून पायउतार व्हावं लागणार होतं. या परिचारिकांनी अनेकदा मागणी देखील केली होती की आम्हाला कायमस्वरुपी**



## शिवसेनेतील बंडावर बोलताना एकनाथ शिंदेंचा विरोधकांवर हल्लाबोल!

। मुंबई । महाईन्यूज ।

सातारा जिल्हातील प्रतापगडावर ३६३ वा शिवप्रतापदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीदेखील हजेरी लावली. कार्यक्रमात बोलताना शिंदे यांनी गड-किल्ल्यांच्या संवर्धनाची गरज असून त्यासाठी नव्या दुर्ग प्राधिकरणाची स्थापना केली जाईल, अशी घोषणा केली. तसेच त्यांनी प्रतापगडाच्या संवर्धनासाठी २५ कोटी रुपयांची निधी देण्याचे जाहीर केले. यावेळी बोलताना त्यांनी शिवसेना पक्षातील बंडखोरीवरही भाष्य केले. आम्ही टीका करणाऱ्यांना आमच्या कामातून उत्तर देऊ. जनतेच्या जे मनात होते तेच आम्ही केलेले आहे. ज्यांनी ३७० कलम हटवले,



अयोध्येत राम मंदिर उभारणीचे काम केले त्यांच्याशी आम्ही युती केली असेही शिंदे म्हणाले.

"शेतकऱ्यांचा पुत्र मुख्यमंत्री होऊ शकत नाही का. सर्वसामान्य कुटुंबातील एक व्यक्ती मुख्यमंत्री झाल्याचे अनेकांना रुचत नाहीये. आम्ही जेथे-जेथे जातोय तेथे अनेक लोक आमच्या स्वागतसाठी उभे आहेत. राज्यात सरकार बदलल्यामुळे चांगली कामे सुरू आहेत, अशा भावना लोक व्यक्त करत आहेत," असे एकनाथ शिंदे म्हणाले.

"हे सरकार आल्यामुळे राज्यात सण मोठ्या उत्त्साहात साजरे केले जात आहेत. परिवर्तन घडले नसते तर आज एवढा उत्साह नसता. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रेरणेने हे सत्तापरिवर्तन झाले आहे. ज्यांच्याकडे काही काम नाही, ते आरोप करत असतात. आम्ही आरोप करणाऱ्यांना कामातून उत्तर देणार आहोत. येथील जनता सुज्ञ आहे. येथील लोकांना कोण कसे काम करत आहे, ते समजते," अशी घणाघाती टीका एकनाथ शिंदे यांनी केली."आम्ही कोणतेही चुकीचे काम केले नाही. या राज्यातील जनतेच्या जे मनात होते, तेच आम्ही केले. अयोध्येमध्ये राम मंदिर बांधण्याचे स्वप्न बाळासाहेब ठाकरे यांचे होते. कलम ३७० हटवण्याची मागणी बाळासाहेब ठाकरेंची होती. तेच काम भाजपाने करून दाखवले. याच भाजपाशी आम्ही युती केली आहे. आमचा कोणताही वैयक्तिक हेतू नाही. कष्टकरी, शेतकरी कामगार, महिलांना न्याय देण्याचा आमचा उद्देश आहे. आपण लोकांना न्याय देणाऱ्या सरकारची स्थापना केली," असेदेखील एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

## महामार्गांच्या कडेला आता अपघात आणि मृत्युच्या आकडेवारीचे झळकणार फलक

। सांगली। महाईन्यूज ।

बेदरकारपणे वाहन चालवून वाहतुक नियमांचा भंग करणाऱ्या वाहतूकदारांच्या जनजागृतीसाठी परिवहन विभागाने मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर 1 डिसेंबर पासून 24 तास करडी नजर ठेवण्याची मोहिम हाती घेणार आहे. यादरम्यान महामार्गावरील ब्लॅक स्पॉट असलेल्या ठिकाणी तेथील अपघात आणि मृत्युंच्या



आकडेवारीची माहिती देणारे फलक सुद्धा झळकवण्यात येणार आहे.

एकाच ठिकाणी पाच अपघात आणि दहा लोकांचा मृत्यु झाल्यास त्या ठिकाणाला ब्लॅक स्पॉट म्हणून घोषीत केले जाते. त्याप्रमाणे मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर 10 ब्लॅक स्पॉट असून, महिन्याला 200 ते 300 अपघातांची संख्या आहे. तर त्यापैकी जिवघेण्यात अपघातांमध्ये सुमारे महिण्याला 100 लोकांचा मृत्यु होत असल्याने अपघातांना रोखण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहे. कोरोना महामारीच्या दरम्यान वाहतुक घटल्याने अपघातांच्या संख्या किंचीत घट झाली होती. मात्र, त्यानंतर पुन्हा गंभीर अपघातांची संख्या वाढली आहे.

परिणामी परिवहन विभागाचे आयुक्त विवेक भिमनवार यांनी मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील अपघात रोखण्यासाठी विविध प्रकारच्या उपाययोजना सुचवल्या आहे. त्यापैकी त्या-त्या ब्लॅक स्पॉटवर झालेले अपघात आणि मृत्युची आकडेवारीचे फलक लावण्यात येणार आहे. रात्रीच्या वेळेत सुद्धा ही फलक स्पष्ट दिसेल त्यासाठी रेडीयमयुक्त अक्षरांमध्ये फलक झळकवण्यात येणार आहे.

# बिल्कीस बानो बलात्कार प्रकरण; 11 आरोपींच्या सुटकेला सर्वोच्च न्यायालयात आव्हान

## स्वत: बिल्कीस बानो सर्वोच्च न्यायालयात दाखल

। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गुजरात दंगलीची न्यायालयीन प्रकरणे संपण्याची चिन्हे दिसत नाहीत. नुकतेच गुजरात सरकारने बिल्कीस बानो सामूहिक बलात्कार प्रकरणातील ११ आरोपींची मुदतपूर्व सुटका केली. या सुटकेला आवाहन देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल झाली आहे. स्वत: बिल्कीस बानो यांनी ही याचिका केली आहे.**



**गोध्रा हत्याकांडानंतर गुजरातमध्ये दंगल उसळली. दंगलीत जमावाने बिल्कीस बानो यांच्या घरावर हल्ला केला. बानो यांच्या कुटुंबियांची हत्या करण्यात आली. हल्ल्यात बानो यांच्या तीन वर्षांच्या मुलीचीही हत्या करण्यात आली. त्यांच्यावर सामूहिक बलात्कार करण्यात आला. बलात्कार झाला तेव्हा बिल्कीस बानो गरोदर होत्या. याप्रकरणी दोषी धरत न्यायालयाने ११ आरोपींना जन्मठेपेची शिक्षा ठोठावली. १५ ऑगस्ट, २६ जानेवारीला विशेष अधिकारांचा वापर करत राज्य सरकार शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांची मुदतपूर्व सुटका करण्याचे आदेश जारी करते. अशाच प्रकारे गुजरात सरकारने बिल्कीस बानो सामूहिक बलात्कार प्रकरणातील ११ आरोपींची सुटका करण्याचे आदेश जारी केले.**

सरन्यायाधीश धनंजय चंद्रचुड यांच्या खंडपीठासमोर या याचिकेवर बुधवारी सुनावणी झाली. या याचिकेवर रितसर सुनावणी घ्यावी, अशी मागणी बिल्कीस बानो यांच्यावतीने करण्यात आली. अन्य प्रकरणांसोबत या याचिकेवर सुनावणी घ्यावी की सुनावणी सुरु असलेल्या खंडपीठासमोर या याचिकेची सुनावणी घ्यावी, याची पडताळणी आम्ही करु, असे सरन्यायाधीश चंद्रचुड यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले. गोध्रा हत्याकांडानंतर गुजरातमध्ये दंगल उसळली. दंगलीत जमावाने बिल्कीस बानो यांच्या घरावर हल्ला केला. बानो यांच्या कुटुंबियांची हत्या करण्यात आली. हल्ल्यात बानो यांच्या तीन वर्षांच्या मुलीचीही हत्या करण्यात आली. त्यांच्यावर सामूहिक बलात्कार करण्यात आला. बलात्कार झाला तेव्हा बिल्कीस बानो गरोदर होत्या. याप्रकरणी दोषी धरत न्यायालयाने ११ आरोपींना जन्मठेपेची शिक्षा ठोठावली.

१५ ऑगस्ट, २६ जानेवारीला विशेष अधिकारांचा वापर करत राज्य सरकार शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांची मुदतपूर्व सुटका करण्याचे आदेश जारी करते. अशाच प्रकारे गुजरात सरकारने बिल्कीस बानो सामूहिक बलात्कार प्रकरणातील ११ आरोपींची सुटका करण्याचे आदेश जारी केले. हे आदेश जारी करताना १९९२ च्या मुदतपूर्व सुटका कायद्याचा आधार घेण्यात आला.

या सुटकेला बिल्कीस बानो यांनी याचिकेद्वारे आवाहन दिले आहे. ही सुटका बेकायदा असल्याचा दावा याचिकेत करण्यात आला आहे. य़ा याचिकेवर कशाप्रकारे सुनावणी होणार हे सर्वोच्च न्यायालय स्पष्ट करणार आहे. मात्र गुजरात सरकारने विशेष अधिकार वापरुन ११ आरोपींची सुटका केली आहे.

# जामीनाच्या अटी-शर्तींमध्ये सुधारणा करण्याची गरज

## सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले मत

।नवी दिल्ली ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

जामीन मंजूर होऊनही त्याच्या अटींची पूर्तता न केल्यामुळे कैदी तुरुंगात सडत असल्याची अनेक प्रकरणे आहेत. ज्या राज्यात उत्पन्नाच्या संधी कमी आहेत, त्या राज्यात विशेषत: ही समस्या अधिक आहे. ज्या अटींची पूर्तता कैद्यांना करता येत नाही, अशा अटींमध्ये बदल करणे हा एकमेव मार्ग आहे, अशी महत्त्वपूर्ण टिप्पणी सर्वोच्च न्यायालयाने केली आहे. तथापि, प्रत्येक प्रकरणात अशा दुरुस्तीसाठी अर्ज दाखल करावा लागेल. त्यामुळे अशा प्रकरणांच्या संख्येचा डेटा गोळा करणे महत्त्वाचे ठरते. येत्या १५ दिवसांच्या आत तुरुंग अधिकाऱ्यांनी अशा कैद्यांची आवश्यक ती माहिती न्यायालयाला देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यानंतर, आठवडाभराच्या आत NALSA (National Legal Services Authority) कडून या कैद्यांना आवश्यक असलेली कायदेशीर मदत देता येणार आहे.

न्यायमूर्ती संजय किशन कौल आणि न्यायमूर्ती ए.एस.ओका यांनी एक तक्ता दिला आहे. त्या तक्त्यानुसार न्यायालयाला माहिती पुरवण्याचे आदेश तुरुंग अधिकाऱ्यांना दिले आहेत.

कैद्याचे नाव –
कैद्यावरील आरोप –
जामीनाची तारीख –
जामीनासाठी कोणते निकष पूर्ण झाले नाहीत –
जामिनाच्या आदेशाची स्थिती –

आदी माहिती भरून सर्वोच्च न्यायालयात सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. ही माहिती प्राप्त झाल्यानंतर हा अहवाल NALSA कडे पाठवण्यात येणार आहे. त्यानंतर, NALSA संबंधित कैद्यांना कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यास मदत करणार आहेत.

याप्रकरणी एक अर्ज सर्वोच्च न्यायालयात सुनावणीसाठी आला होता. त्यावर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने ही महत्त्वपूर्ण टीप्पणी केली आहे. सर्वोच्च न्यायालायने दिलेल्या

# मोदींविरोधात खरगेंच्या विधानामुळे भाजपकडून गुजराती अस्मितेचा मुद्दा

।नवी दिल्ली ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**गुजरातमध्ये मतदानाच्या तोंडावर वाद शिगेला**

काँग्रेसचे पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा 'रावण' असा उल्लेख केल्यामुळे गुजरात विधानसभा निवडणुकीच्या प्रचारातील काँग्रेस आणि भाजप यांच्यातील राजकीय चिखलफेकीने उग्र रूप घेतले आहे. खरगे यांच्या मोदींवरील उपहासात्मक टिप्पणीमुळे भाजपच्या हाती कोलीत मिळाले असून 'गुजराती अस्मिते'ला विरोध करणाऱ्या काँग्रेसला मत न देण्याचे आवाहन भाजपचे नेते करत आहेत. अहमदाबादमधील बेहरामपुरा भागात सोमवारी प्रचारसभेत, खरगे यांनी मोदींना उद्देशून 'तुम्ही १०० तोंडांचे रावण आहात का?' असा खोचक प्रश्न विचारला होता. मोदी सगळीकडे दिसतात, महापालिकेच्या निवडणुकीत, विधानसभेच्या निवडणुकीत, लोकसभा निवडणुकीत, सगऴ्याच निवडणुकीत मोदींचा चेहरा पुढे केला जातो. महालिकेच्या निवडणुकीत उमेदवारांच्या नावे मत मागा, पालिकेत गरज लागली तर मोदी काम करायला येणार आहेत



# पसमांदा मुस्लिमांपर्यंत पोहोचण्याच्या मोदींच्या धोरणाला गती

## दिल्ली महापालिका निवडणुकीत भाजपकडून चार उमेदवार रिंगणात

। मुंबई । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

भाजपच्या प्रतिमा बदलाच्या प्रयोगामध्ये मुस्लिमांमधील मागास आणि अतिमागासांपर्यंत (पसमांदा) पोहोचण्याच्या पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या धोरणानुसार दिल्ली महापालिकेच्या निवडणुकीत पहिल्यांदाच चार पसमांदा मुस्लिमांना भाजपची उमेदवारी देण्यात आली आहे.




'भाजपने दिल्ली महापालिका निवडणुकीत नेहमीच चार-पाच मुस्लिमांना उमेदवारी दिली पण, यावेळी पहिल्यांदाच ओबीसी मुस्लिमांना उमेदवारी दिली आहे. उमेदवारी दिलेल्या पसमांदा मुस्लिमांच्या चारही प्रभागांमध्ये ८० टक्के मतदार ओबीसी-दलित मुस्लिम समाजातील आहेत. एका मुस्लिम उमेदवाराने जरी निवडणुकीत विजय मिळवला तरी, भाजपचा पसमांदा मुस्लिमांशी जोडून घेण्याचा मार्ग सुकर होऊ शकेल', अशी आशा राष्ट्रवादी मुस्लिम पसमांदा समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि भाजपचे नेते आतिफ रशीद यांनी व्यक्त केली. भाजपच्या हैदराबादमध्ये झालेल्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, पसमांदा मुस्लिमांना भाजपच्या परीघात आणण्याचे उद्दिष्ट भाजपच्या नेत्यांसमोर ठेवले होते. त्याचाच भाग म्हणून यावेळी दिल्ली महापालिकेत पसमांदा मुस्लिमांना उमेदवारी देण्यात आली आहे. गेल्या आठ वर्षांत लोकसभा तसेच, विधानसभा निवडणुकांमध्ये भाजपने मुस्लिमांना उमेदवारी दिली नाही. आगामी लोकसभा निवडणुकीतही मुस्लिमांना उमेदवारी दिली जाण्याची शक्यता नसली तरी, हिंदूमधील ओबीसी आणि दलितांप्रमाणे मुस्लिमांमधील ओबीसी-दलितांना मतदार बनवण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न भाजपकडून केले जात आहेत.

मुस्लिमांमधील मागास राहिलेल्या ओबीसी-दलित समाजाला पसमांदा मुस्लिम म्हटले जाते. देशातील सुमारे १९ टक्के मुस्लिम लोकसंख्येत ८०-८५ टक्के पसमांदा मुस्लिम आहेत. उत्तर प्रदेश, बिहार, कर्नाटक, मध्य प्रदेश, दिल्ली, केरळ, झारखंड या राज्यांमध्ये पसमांदा मुस्लिमांची मते निर्णायक ठरू शकतात . भाजप मागास-अतिमागास मुस्लिमांपर्यंत विकास पोहोचवण्याचा प्रयत्न करत आहे. मग, आम्ही मुस्लिमविरोधी असल्याचा आरोप का केला जात आहे', असा सवाल आतिफ रशीद यांनी केला. उत्तर प्रदेशमध्ये ३.५ कोटी तर, बिहारमध्ये १.५ कोटी पासमांदा मुस्लिम आहेत.

गोहत्या आणि गोमांस विक्रीच्या कथित आरोपांमध्ये अन्सारी, कुरेशी समाजातील लोकांना मारहाण केल्याच्या अनेक घटना झाल्या

# कोणालाही कळू न देता मी...” अखेर सायली संजीवने उघड केलं गुपित

अभिनेत्री सायली संजीव ही सध्या तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे तसंच तिच्या कामामुळे प्रचंड चर्चेत आहे. लवकरच ‘गोष्ट एका पैठणीची’ या चित्रपटातून ती प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. ती सध्या या चित्रपटाचे जोरदार प्रमोशन करताना दिसते. या दरम्यान तिने या चित्रपटाशी निगडित तिचं एक गुपित उघड केलं आहे. सायली संजीव ही चित्रपटसृष्टीतील एक बहुआयामी अभिनेत्री म्हणून ओळखली जाते. तिने आतापर्यंत साकारलेली प्रत्येक भूमिका ही वैविध्यपूर्ण असून प्रत्येक कामात ते तिचं काहीतरी वेगळं देण्याचा प्रयत्न करते. ‘पैठणी’ या तिच्या आगामी चित्रपटाच्या निमित्तानेही तिने अशीच एक गोष्ट केली आहे. या चित्रपटातील पात्र साकारण्यासाठी तिने कोणालाही न सांगता शिवणाचा क्लास लावला होता. आता एका मुलाखतीत तिने हे गुपित उघड केलं आहे. सायलीने सांगितलं,



“या चित्रपटात मी शिवणकाम करणारी, आजूबाजूच्या बायकांच्या साड्यांना फॉल बिडिंग करून देणारी, ब्लाऊज शिवून देणारी एका साध्या गृहिणीची भूमिका साकारत आहे. मला अभिनयाच्या जोरावर ही भूमिका नक्कीच साकारता आली असती. पण त्यात नैसर्गिकता आणण्यासाठी आणि त्या भूमिकेशी एकरूप होण्यासाठी मी दोन दिवसांचा शिवणकामाचा क्लास लावला. मी शिवणकामाचा क्लास लावला आहे ही गोष्ट मी कोणालाही सांगितली नाही.”पुढे ती म्हणाली, “‘गोष्ट एका पैठणीची’ या चित्रपटात मी अतिशय जुन्या काळातील मशीनवर काम करतेय. त्यामुळे मला शिलाई मशीन हाताळणे, सुईमध्ये दोरा भरणे, मशीनमध्ये तेल टाकणे या सगळ्या गोष्टींची माहिती असणं गरजचं होतं. कुठेही माझा अभिनय कृत्रिम वाटू असे असं मला मनापासून वाटत होतं. म्हणूनच कोणालाही कळू न देता मी हा शिवण कामाचे प्राथमिक धडे घेतले होते.”

# प्रिया बापटचा भन्नाट किस्सा

गेली काही दिवस सुबोध भावेच्या 'बस बाई बस' या कार्यक्रमाची भलतीच चर्चा आहे. झी मराठी वाहिनीवरील 'बस बाई बस' या नव्या मालिकेत महिला कलाकार, राजकारणी सहभागी होतात यावेळी त्यांना इतर महिलांच्या मनातले प्रश्न विचारले जात आहेत. अशी भन्नाट संकल्पना असणाऱ्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुबोध भावे (SUBODH BHAVE) करत आहे. या कार्यक्रमात आजवर अनेक दिग्गजांनी हजेरी लावली आहे. मराठीसह हिंदीलाही भुरळ घालणारी अभिनेत्री



प्रिया बापट हिने नुकतीच या कार्यक्रमात हजेरी लावली. यावेळी तिने तिच्या नाटकाचा एक भन्नाट किस्सा सांगितला. हा किस्सा ऐकून तुम्हीही हसून वेडे व्हाल.. मालिका, चित्रपट, नाटक, वेब सिरिज अशा विविध माध्यमातून प्रेक्षकांना भुरळ घालणारी प्रिया नुकतीच बस बाई बस या शो मध्ये आली होती. यावेळी एका मजेशीर प्रश्नावर प्रियाने दिलेले उत्तर ऐकून एकाच हशा पिकला. प्रियाने बरीच वर्षे व्यावसायिक नाटकात काम केले आहे. त्याच नाटका दरम्यानचा हा किस्सा आहे. यावेळी सुबोध भावेने प्रियाला विचारले, 'कलाकार कधी वाक्य विसरतात, कधी जास्तीची वाक्य घेतात, यामुळे बऱ्याचदा नाटक लांबतं. अडीच तासाचं नाटक कधीकधी तीन तासाचं होतं.

# रश्मिका अजूनही गुंतलीय जुन्या नात्यात

रश्मिका मंदाना दक्षिणेतील प्रसिद्ध अभिनेत्रींपैकी एक आहे. तिच्या सिनेमांपेक्षा अधिक नेहमीच तिच्या सौंदर्याची चर्चा रंगलेली दिसून येते. लोक तिच्या एका स्माईलवर जीव ओवाळून टाकताना दिसतात. सध्या रश्मिका आपल्या नव्या बॉलीवूडच्या सिनेमामुळे चर्चेत पहायला मिळतेय.



याच सिनेमाच्या प्रमोशन निमित्तानं गेली असताना रश्मिकानं काही पर्सनल गोष्टी देखील शेअर केल्या आहेत. ती अजूनही आपल्या एक्स बॉयफ्रेंडला भेटते,त्यासाठी काही कारणच असावं असं नाही असं सांगतानाच आमच्यात अजूनही चांगलं नातं आहे असं म्हणून गेली रश्मिका. आणि बस्स चर्चेला उधाण आलं. याचवेळी रश्मिका म्हणाली,"प्रेमाचं नातं तुटल्यानंतरही आमच्यात मैत्रीचं नातं इतकं चांगलं टिकून राहिलंय यावर माझा अजूनही विश्वास बसत नाही". रश्मिका लवकरच 'गूडबाय' या सिनेमातून बॉलीवूड इंडस्ट्रीत पदार्पण करतेय. रश्मिकाला या सिनेमाच्या प्रमोशन निमित्तानं दिलेल्या एका मुलाखतीत विचारलं गेलं की,'जर एखाद्या पार्टीत तुला तुझा जुना बॉयफ्रेंड भेटला तर तुझी रिॲक्शन काय असेल?' तेव्हा तिनं 'नमस्ते' असं उत्तर दिलं. पुढे ती म्हणाली,"माझ्या एक्ससोबत माझी अजूनही चांगली मैत्री आहे. मी त्याच्यासोबतच त्याच्या कुटुंबियांना भेटणंही पसंत करते". एवढ्यावरच रश्मिका थांबली नाही तर तिनं हे स्विकारलं की,"खरंतर त्याचं लग्न झाल्यानंतर मी त्याला भेटणं ही चांगली गोष्ट नाही पण आमच्यात मैत्रीचं खूप चांगलं नातं आहे, पण मग हे देखील चांगलंच आहे नाही का".

# “मी मराठी असल्याचा...” अभिजीत सावंतचे स्पष्ट वक्तव्य



मोहब्बतें लुटाऊंगा हे गाणं ऐकलं तरीही आपल्या डोळ्यासमोर लोकप्रिय गायक अभिजीत सावंत हे नाव येते. या गाण्याने प्रेक्षकांना अक्षरश: वेड लावले होते. या गाण्यामुळे प्रसिद्धीझोतात आलेला अभिजीत सावंत आजही अनेकांच्या लक्षात आहे. अभिजीत सावंत हा इंडियन आयडल या अतिशय लोकप्रिय ठरलेल्या रिॲलिटी शोमुळे घराघरात पोहोचला. इंडियन आयडलचे पहिले पर्व गायक अभिजीत सावंतने जिंकले होते. नुकतंच त्याने त्याच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी त्याने मराठी संस्कृतीबद्दल थेट भाष्य केले. छोट्या पडद्यावरील अतिशय लोकप्रिय रिॲलिटी शो म्हणजे ‘इंडियन आयडल.’ इंडियन आयडलचे पहिले पर्व गायक अभिजीत सावंतने जिंकले होते. ही स्पर्धा जिंकल्यानंतर त्याला अनेक गाण्यांच्या ऑफर आल्या होत्या. यामुळे त्याचे आयुष्य रातोरात बदलले होते. अभिजीत सावंतला नुकतंच मराठी संस्कृती, करिअर याबद्दल प्रश्न विचारण्यात आले. त्यावेळी त्याने त्याला याचा काय फायदा झाला आणि काय तोटा झाला याबद्दल खुलासा केला.अनेकांनी अगदी अचूक अंदाज लावला आहे.

# नवी मालिका ‘शाब्बास सुनबाई’ एका रोमांचकारी वळणावर



लग्नानंतर स्वतःच्या संसारात अडकून पडल्यावर आपली स्वप्नं, स्वप्नंच राहून जातात. लग्नानंतर बऱ्याचजणी चूल आणि मूल ह्यातच अडकून राहतात. पण अशातही मार्ग काढून आपली स्वप्नं पूर्ण करणाऱ्या प्रत्येकीची गोष्ट म्हणजे ‘शाब्बास सुनबाई’. आपली स्वप्नं न विसरता त्या स्वप्नांसाठी झटणाऱ्या आणि समोर येईल त्या आव्हानांना सामोरे जाणाऱ्या अशा सगळ्यांसाठीची आपल्या लाडक्या सन मराठी ह्या वाहिनीवर नुकतीच सुरु झालेली ‘शाब्बास सुनबाई’ ही मालिका तुम्हाला नक्कीच आवडेल. जगाच्या स्पर्धेत नेहमी पहिलं येण्यासाठी वडिलांनी घडवलेल्या संजीवनीला तिच्या स्वप्नांसाठी खऱ्या अर्थाने संघर्ष करावा लागणार आहे तिच्या लग्नानंतर. ध्यानीमनी नसताना नाशिकच्या प्रतिष्ठित येवलेकर कुटुंबात लग्न झालेल्या संजीवनीसाठी सगळी चक्र लग्नानंतर फिरली. संजीवनीला नेमका कशाशी आणि कोणाशी संघर्ष करावा लागणार आहे? ‘शाब्बास सुनबाई’ म्हणणाऱ्या अप्पा येवलेकरांचा संजीवनीला

# विश्वविजेत्या फ्रान्सवर पराभवाची नामुष्की!

## ट्युनिशियाने विजयी रथ रोखला

**नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था**



फिफा वर्ल्डकपमध्ये आज मोठा उलटफेर झाला. विश्वविजेत्या फ्रान्सचा ट्युनिशियाने 1 - 0 असा पराभव केला. फ्रान्सचा हा 2014 नंतरचा वर्ल्डकपमधील पहिला पराभव आहे. तर ग्रुप D मधील दुसऱ्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने डेन्मार्कचा 1- 0 असा पराभव करत बाद फेरीत प्रवेश केला. जरी ट्युनिशियाने फ्रान्सला पराभवाचा धक्का दिला असला तरी त्यांना बाद फेरी मात्र गाठता आली नाही. फ्रान्सने ट्युनिशियाशी बरोबरी साधण्याचा शेवटच्या सेकंदापर्यंत प्रयत्न केला. ग्रीझमनने स्टॉपेज टाईमच्या 10 व्या मिनिटाला गोल केला खरा मात्र रेफ्रींनी VAR नंतर हा गोल अवैध ठरवला. फ्रान्स आणि ट्युनिशिया यांच्यातील सामना पहिल्या हाफपासूनच चुरशीचा राहिला. बलाढ्य फ्रान्सने ट्युनिशियाच्या गोलपोस्टवर आक्रमक चढाया केल्या. मात्र फ्रान्सला पहिल्या हाफमध्ये गोल करता आला नाही. दुसऱ्या हाफमध्ये ट्युनिशियाने फ्रान्सवर पहिला गोल करत विश्वविजेत्यांना मोठा धक्का दिला. वाहबी खाझरीने 58 व्या मिनिटाला लौडोनीच्या सहाय्याने गोल डागला. यानंतर खडबडून जाग्या झालेल्या फ्रान्सने आपली अव्वल फळी मैदानात उतरवली एम्बाप्पे आणि ग्रीझमन मैदानात आले. मात्र या दोघांनाही 90 मिनिटापर्यंत बरोबरीचा गोल करता आला नाही.

दरम्यान, स्टॉपेज टाईमच्या 10 व्या मिनिटाला ग्रीझमवने गोल केला खरा मात्र रेफ्रीने हा गोल VAR नंतर अवैध ठरवला. यामुळे अखेच्या क्षणी पराभवाची नामुष्की टाळण्याचा फ्रान्सचा प्रयत्न देखील फेल गेला. फ्रान्सचा हा वर्ल्डकपमधील सलग सहा विजयानंतरचा पहिला पराभव ठरला. ग्रुप D मधील दुसऱ्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने डेन्मार्कचा 1 - 0 असा पराभव केला. या सामन्यात देखील पहिला हाफ हा गोलशून्य बरोबरीत राहिला. मात्र दुसऱ्या हाफमध्ये ऑस्ट्रेलियाने 60 व्या मिनिटाला आपला पहिला गोल करत आघाडी घेतली. मॅथ्यू लेकैने मॅग्रीच्या असिस्टवर गोल करत आपल्या संघाला आघाडी मिळवून दिली. यानंतर डेन्मार्कने हा गोल फेडण्यासाठी जोरदार आक्रमक चढाया केल्या. मात्र डेन्मार्कला काही बरोबरी साधता आली नाही. ऑस्ट्रेलियाचा हा सलग दुसरा विजय ठरला.

# पावसामुळे मालिकेतील तिसरा सामना रद्द!

## न्यूझीलंडने 1-0 ने मालिका घातली खिशात

**नवी दिल्ली, । महाईन्यूज । वृत्तसंस्था**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील तिसरा व अखेरचा एकदिवसीय सामना बुधवारी म्हणजेच आज ख्राईस्टचर्च येथे खेळवला गेला. न्यूझीलंड दौऱ्यातील संपूर्ण सामन्यांवर पावसाचे सावट दिसून आले. दोन्ही संघांपैकी कोण जिंकणार यापेक्षा पाऊस पडणार का यावरच बरीच चर्चा झाली. मालिकेतील तिसरा सामना देखील पावसामुळे वाहून गेला आणि त्यामुळे न्यूझीलंडने १-० अशी मालिका खिशात घातली.

तत्पूर्वी, सामन्याआधीही पावसाने हजेरी लावल्याने नाणेफेकीला थोडा विलंब झाला. तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेत १-० अशी अभेद्य आघाडी घेत न्यूझीलंडने टी२० मालिकेतील उट्टे एकदिवसीय मालिकेत काढले. न्यूझीलंडचा कर्णधार केन विलियम्सन नाणेफेकीच्या बाबतीत पुन्हा नशीबवान ठरला, त्याने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. न्यूझीलंडच्या घातक गोलंदाजीसमोर भारतीय फलंदाजांनी नांगी टाकली. सर्वबाद २१९ धावा करत भारताने विजयासाठी केवळ २२० धावांचे लक्ष किवी संघासमोर ठेवले होते. आज भारतीय संघासमोर मालिका वाचवण्याच्या आव्हानासोबतच क्रमावारीत सुधारणा करण्याचे लक्ष्य असणार होते मात्र त्यात संघ सपशेल अपयशी ठरला.




महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असू द्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही